


सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे




बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ थे ■ अंक १५८ ■ शनिवार दि. २७ जुलै २०२४ ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ पाने-४ ■ किंमत ३ रुपये Email-prarambh2023@gmail.com

# आरक्षण मिळवणे आणि पाडापाडी करणे हेच उद्दिष्ट

## मनोज जरांगेंनी साधला पवारांसह दरेकरांवर निशाणा

संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सत्ताधाऱ्यांसह राजकीय वर्तुळात आणि आंदोलक मनोज जरांगे यांची दररोज टोलवाटोलवी होत असताना, मराठा समाजासाठी आरक्षण मिळवणे आणि पाडापाडी करणे हेच उद्दिष्ट असल्याचे सांगत मनोज जरांगे यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह दरेकर व प्रकाश आंबेडकरांवरही निशाणा साधलाय.मराठा आरक्षण प्रश्न स्थगित केलेल्या उपोषणानंतर मनोज जरांगे यांनी शरद पवारांच्या बैठकीवर टीका करत लाईव्ह बैठक घेण्यापेक्षा डोंगरावर जाऊन मोठ्याने बोला आणि लाइव्ह करा. यांच्या कुठेही भेटी होतात मात्र आरक्षणासाठी बोलत नाहीत. आणि म्हणतात आम्ही लाईव्ह करायचं. असं मनोज जरांगे म्हणालेत. समाजात गोंधळ निर्माण करून गैरसमज पसरवण्याच्या षडयंत्र असल्याचे सांगत त्यांनी दरेकरांवरही निशाणा साधलाय.



### तुम्ही आरक्षण देणार नसाल तर पाडापाडी करावीच लागेल

सध्या मराठा समाजासाठी आरक्षण मिळवणे आणि पाडापाडी करणे हेच उद्दिष्ट असल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले. मराठा समूह समाजाला घुमवाघुवी करत आहेत. या दोघांनी मिळून आरक्षण द्यायला हवे. मनात असेल तर काही करता येतं. शरद पवारांनी लाईफ बैठक घेण्यापेक्षा डोंगरावर जाऊन मोठ्याने बोलून लाइव्ह करावे. यांच्या कुठेही भेटी होतात मात्र आरक्षणासाठी ते बोलत नाहीत. सत्तर वर्षांपासून सगळे वेड्यात काढत आहेत, असं म्हणत मनोज जरांगे यांनी शरद पवारांवर टीका केली.

### समाजाने नेत्यांच्या हमाल्या करायच्या का?

राजकीय लोकांचे डाव असून मराठा मोठे झालेले यांना जमत नाही. समाजाला काही माहिती किंवा राजकीय नेते आणि समाजाला माहिती हवी असेल तर सर्व लाईव्ह आहे. सत्ताधारी आणि विरोधक गैरसमज पसरवणारे आहेत. समाजाने नेत्यांच्या हमाल्या करायचा का ?असा सवाल करत सत्ताधाऱ्यांवर मनोज जरंगे यांनी संताप व्यक्त केला.

### दरेकरांवर हल्लाबोल

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा दरेकरांवर हल्लाबोल केलाय. फुकटात निवडून येणारे मिस गाईड करतात मागील दारातून गैरसमज निर्माण करतात असं म्हणत मराठ्यांच्या लाटेत हे होरपळून जाणार असल्याचे मनोज जरांगे म्हणाले. नेत्याला खुश करावे लागते अन्यथा दुसऱ्या वेळी सत्ता मिळत नाही. असे म्हणत त्यांनी प्रवीण दरेकरांना टोलावले.

## आष्टी मतदारसंघात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा

### खा.बजरंग सोनवणे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

बीड । प्रतिनिधी

आष्टी/पाटोदा तालुक्यासह जिल्हाभरात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मदती संदर्भात गुरूवारी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे.



जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, मागील २ ते ३ दिवसांपासून आष्टी, पाटोदा तालुक्यासह जिल्हाभरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा, उडीद,सोयाबीन, पिकांबरोबर इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या पिकांचे नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळून देण्याकरिता सुयोग्य ती कार्यवाही करावी. जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी घरांची पडझड झालेली असेल, शेती खरडून गेलेली असेल अशा ठिकाणी आपल्या तलाठ्यांनी स्वत: भेटी देवून स्थळ पंचनामे करून सामान्य नागरिकांना वेळेत मदत मिळवून देण्यासाठी काम करावे, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले असून त्यांच्या नुकसानीचे पंचनामे वेळेत करणे आवश्यक आहे. शासन स्तरावर मदत करण्यासाठी पंचनामे आवश्यक असतात. यामुळे तातडीने पंचनामे करून अहवाल तयार करावा, असेही पत्रात म्हटले आहे. खा.बजरंग सोनवणे हे सद्या दिल्ली येथे अधिवेशनात आहेत. तरीही त्यांचे जिल्ह्याकडे लक्ष लागलेले असून शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भात त्यांनी पत्रव्यवहार केला आहे.

## बीडमध्ये तायक्वांदो खेळासाठी स्वतंत्र हॉल उभारू-डॉ.योगेश क्षीरसागर

### बीडमध्ये राज्यस्तरीय स्पर्धेचे थाटात उद्घाटन; ४५० खेळाडूंचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

शहरामध्ये तायक्वांदो खेळाला चांगले वातावरण असून या आधुनिक खेळासाठी बीड शरामध्ये तायक्वांदोसाठी स्वतंत्र हॉल उभारण्यासाठी नक्कीच प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. शहरातील क्रीडा संकुल येथील इनडोअर हॉलमध्ये ३४ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेचे शुक्रवारी (दि.२६) थाटात करण्यात आले. या स्पर्धेत ४५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर राज्य संघटनेचे महासचिव मिलिंद पठारे, अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे, कोषाध्यक्ष व्यंकटेश कररा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, तायक्वांदो खेळाबद्दल ▶▶ पान २ वर...





### आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार; ज्ञानेश्वर स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून भरतनाट्यम

बीडचे आंतरराष्ट्रीय खेळाडू अविनाश पांचाळ, सचिन जायभाये, राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला खेळाडू श्रवण तांबारे यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर स्पर्धेच्या उद्घाटनानंतर ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यमचे बहारदार नृत्य सादर केले. गणेश वंदनाचे नृत्य सादर करून उपस्थितांकडून वाहवाह मिळविली.

## मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरावेळी माझ्याकडून 'ती' चूक झाली; पवारांची कबुली

मुंबई । प्रतिनिधी

नामांतराचा निर्णय घेतला तेव्हा मी विधानसभेतील सदस्यांना बोलावून निर्णय घेतला. त्याची रिॲक्शन इथे झाली. ती झाल्यानंतर त्याची किंमत काही गरीब लोकांना मोजावी लागले. तेव्हा माझ्या लक्षात माझी चूक आली. माझी चूक एक होती, ती म्हणजे मी मुंबईत बसून निर्णय घेतला. ज्यांची नाराजी होती, त्यांच्याशी संवादच साधला नव्हता. त्यानंतर मी स्वत: बाकीचा कार्यक्रम थांबवला. मी मराठवाड्यातील सर्व कॉलेजात गेलो आणि विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. त्यानंतर वर्ष दोन वर्षांनी लोकांनी आमच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे, असं शरद पवार म्हणालेत.



आरक्षणावर पवार काय म्हणाले?

आरक्षणावर मतभेद नाही. काही गोष्टी अशा आहेत की मला काळजी दुसऱ्या गोष्टीची आहे. दोन वर्गात अंतर वाढतं की काय अशी स्थिती मला दिसते. मराठवाड्यातील दोन तीन जिल्ह्यात याची अधिक काळजी घेण्याची गरज आहे असं वाटतं. मला काही सहकाऱ्यांनी सांगितलं की, अनेक ठिकाणी कुणाचं रेस्टॉरंट असेल अमूक समाजाच्या व्यक्तीचं असेल तर दुसऱ्या समाजाची व्यक्ती तिथे जात नाही. हे खरं असेल तर ते चिंताजनक आहे. ही स्थिती बदलली पाहिजे. त्यासाठी आमच्यासारख्यांनी अधिक लक्ष दिलं पाहिजे, असं शरद पवार म्हणाले.

उद्या निवडणुका, संसदेचं अधिवेशन संपल्यावर आम्ही याबाबतचा संवाद साधण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागेल. आज मराठवाड्यात जो वाद निर्माण झाला आहे. त्या संदर्भात आम्ही नव्या पिढीशी संवाद साधणार आहोत. ते काम आम्ही करणार (पान २ वर)



खा.बजरंग सोनवणे यांनी छत्रपती संभाजी नगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. उपोषणाने प्रकृती खालावल्याने त्यांची तब्येत तेवढी चांगली नाही. परंतु हळूहळू त्यात सुधारणा होत आहे.तब्येतीची काळजी घ्या, असा आग्रह केला. आदरणीय मनोजदादा लवकरच उपचारानंतर बाहेर पडून समाजाच्या आंदोलनात सक्रिय होतील. दादांची भेट नेहमीच ऊर्जा देणारी असते. यावेळी हॉस्पिटल मधील डॉक्टरांची व स्टाफची भेट घेऊन आदरणीय मनोजदादांवर सुरू असलेल्या उपचारांची माहिती घेतली.

## सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागरांनी रस्ता, पाण्यासाठी बीडकरांना वेठीस धरले

### सामाजिक कार्यकर्ते बी. बी. जाधव यांचा आरोप

बीड । प्रतिनिधी

मागच्या ४० वर्षांपासून बीड शहर आणि मतदार संघाची सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागर घराण्याने बीडमधील नागरिकांना पाणी व रस्त्यापासून वंचित ठेवले. ऐन पावसाळ्यात देखील बीडकरांना नळाचे पाणी मिळायला महिनाभर वाट पहावी लागते. क्षीरसागरांचे अपयश आणि सत्तालोलुपणाच बीडकरांच्या समस्येचे कारण असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते बी. बी. जाधव यांनी केला आहे.

याबाबत पत्रकात म्हटले आहे की, शहरात कुठल्याच रस्त्यांची अवस्था धड नाही. सर्वत्र खड्डे आणि चिखल असल्याने बीडकरांना वागताना मोठा त्रास सहन करावा लागतो. नाल्यांची स्वच्छता केली जात नाही. नाल्या कधी उपसल्या तर त्यातली घाण नेऊन टाकली जात नाही. शहरातील कुठल्याही भागात गेले तरी कचरा कुंड्या ओव्हरफ्लो असून या बाजूलाच जनावरे, कुत्र्यांचा वावर असतो. यामुळे बीडमध्ये सगळ्याच भागात घाण आणि दुर्गंधी आहे. गोरगरिब बिडकरांना डेंगीची लागण देखील यांच्यामुळेच झाल्याचा गंभीर आरोपही बी. बी. जाधव यांनी केला. बीडमधील दवाखाने गरीब रुग्णांनली गच्च भरले आहेत. याचे श्रेय देखील क्षीरसागरांचेच आहे.




कायम कुठल्याही बाबतीत श्रेय घेण्यासाठी पुढे येणाऱ्या आणि आपणच सत्तेत आहोत असे समणाऱ्या क्षीरसागरांमुळेच बीडच्या जनतेला पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ऐन पावसाळ्यात देखील बीडकरांना पाणी मिळत नाही. याला यांचेच अपयश कारणीभूत असल्याचा आरोपही बी. बी. जाधव यांनी केला.

## शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी वेठीस धरणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### विजयसिंह पंडित यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

गेवराई । प्रतिनिधी

पिक कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत बँकांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिळवणुक केली जात आहे. पिक कर्जासाठी विमा पॉलिसी अनिवार्य करून बँकेचे अधिकारी पिक कर्जातही पैसे कमविण्याचा नवा उद्योग करत आहेत. पिक कर्जासाठी बँकेच्या प्रत्येक शाखेला दिलेले टार्गेट पूर्ण होत नाही, त्यामुळे पिक कर्ज वाटपात अक्षम्य टाळाटाळ करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणुक करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी याप्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.



खरीप हंगामाच्या सुरुवातीला चांगले पर्जन्यमान झाल्यामुळे शेतकऱ्यांनी बी-बियाणे आणि खतांवर मोठा खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी यासाठी विविध बँकांकडे पिक कर्जाची मागणी केली आहे. शासनाने सिबील स्कोअर न पाहता पिक कर्ज द्यावे, पिक कर्ज देण्यासाठी शेतकऱ्यांची अडवणुक करू नये असे आदेश दिलेले असतानाही स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेचे व्यवस्थापक भुपेंद्र लारोकर व फिल्ड ▶▶ पान २ वर...

## रोज झाडाखाली आणि पाऊस आल्यावर गोठ्यात भरते शाळा

### वंजारवाडी वस्तीशाळेला १० वर्षांपासून इमारतच नाही; शिक्षण विभागाचे दुर्लक्ष-डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळे अंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांना गेल्या १० वर्षांपासून इमारतच नाही. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची उभारणी केली होती.दोन महिन्यांपूर्वी झालेल्या वादळवा-यात पत्र्याचे शेड उडुन गेले त्यामुळे आता विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे. मात्र पाऊस आल्यावर गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत असल्याने वस्तीवरील पालकांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. या शाळेसाठी निदान एका खोलीसाठी निधी देऊन तातडीने बांधकाम करून विद्यार्थ्यांच्या पायाभुत शिक्षणाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना केली आहे.



वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शिवारात बाहेगव्हाण शाळे अंतर्गत वंजारवाडी वस्ती येथे १० वर्षांपूर्वी जिल्हा परिषद वस्तीशाळेची स्थापना झाली.शाळा स्थापनेनंतर काही दिवसांनी वस्तीवरील ग्रामस्थांनी एकत्र येत वर्गणी गोळा करून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची खोली बनवली याच पत्र्याच्या शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत होते.परंतु दोन महिन्यांपूर्वी आलेल्या वादळ वा-यामध्ये पत्र्याचे शेड उडाले.त्यामुळे विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे.वंजारवाडी वस्ती येथे इयत्ता १ ते ५ वी पर्यंतचे वर्ग आहेत. सध्या विद्यार्थी पटसंख्या २३ असुन दोन शिक्षक कार्यरत आहेत.शाळेच्या स्थापनेपासून इमारतीची मागणी होत असताना देखील अद्याप शाळेला ईमारत मिळाली नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांना कधी झाडाखाली तर कधी गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत ▶▶ पान २ वर...

# लोकमान्य लोकनेत्या पंकजाताई मुंडे

**प्रदीप कुलकर्णी**

महाराष्ट्राच्या राजकारणात 'मुंडे' नावाचा जो आज दबदबा आहे तो केवळ लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यामुळे..आणि त्यांच्यानंतर हा दबदबा असाच पुढे टिकून राहिलाय तो 'ताईसाहेब' अर्थात पंकजाताई यांच्यामुळेच..हे त्रिवार सत्य आहे. पंकजाताईंची राजकीय ताकद, आक्रमक शैली, सर्वांना सोबत घेऊन जाणारं त्यांचं नेतृत्व, समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा असणारा मोठा पाठिंबा आणि वंचित, पिडित घटकांसाठी काम करण्याची त्यांची तळमळ याची प्रचिती महाराष्ट्राला वारंवार आलेली आहे येत आहे. स्वाभिमानी आणि कणखर बाणा यामुळे राजकारणात त्यांची एक वेगळी छाप आहे. निवडणूक म्हटलं की जय-पराजय असतो पण बीडच्या निवडणुकीत त्यांचा झालेला निसटता पराभव सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या मनाला इतका जिव्हारी लागला की, आत्महत्येसारख्या घटना घडल्या. हे असं एखाद्या राजकीय नेत्याच्या बाबतीत क्वचितच घडलं असेल. महाराष्ट्राच्या राजकारणात असं यापूर्वी कधी झाला नसावं. आपल्या लाडक्या नेत्याच्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी स्वतःच्या जीवाचं बरं-वाईट करणं ही तशी वेदनादायक आणि मनाला चटका लावणारी गोष्ट..पण यातून एखाद्या नेत्यांवर सामान्य माणूस किती जीवापाड प्रेम करतो हे ही दिसून येतं, पंकजाताईंच्या बाबतीत देखील असंच झालं. केवढ हे प्रेम..! पंकजाताईंच्या मागे असणारी जनशक्ती किती प्रचंड आहे, हे सत्ता अथवा कोणतही संवैधानिक पद नसताना शिवशक्ती परिक्रमा





असो की दसरा मेळावा यात वेळोवेळी दिसून आलेलं आहे. लोकसभेत झालेल्या पराभवानंतर पंकजाताईंना दुर्लक्षित करून चालणार नाही हे लक्षात आल्यानं भारतीय जनता पक्षानं त्यांना विधानपरिषदेवर संधी दिली आणि त्या आमदार म्हणून विजयी झाल्या. या विजयाने राज्यातील लाखो, करोडो कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा नवचैतन्य निर्माण झाले. कोण आली रे कोण आली, महाराष्ट्राची वाघीण आली या गर्जनेने महाराष्ट्राचं विधानभवन त्यादिवशी अक्षरशः दणाणून गेलं. लोकसभेतील पराभवानंतर पंकजाताई खचून गेल्या नाहीत, पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागल्या. 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' या ध्येयाने महाराष्ट्राची ही वाघीण पुन्हा मैदानात उतरली आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. तरीही त्यावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी-अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं. महाराष्ट्रातील लाखो- करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन् प्रेमाची भावना आहे, हिच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते. पंकजाताई कधी कोणाचं वाईट चिंतणार नाहीत की करणार नाहीत, त्या त्रास सहन करणाऱ्या पैकी आहेत, देणाऱ्या पैकी मुळीच नाहीत, ही भावना, हा आदर आज त्यांच्याविषयी सामान्य कार्यकर्त्यांमध्ये आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कोणाची हुजरेगिरी करणे, झुकणे त्यांच्या रक्तात नाही तथापि राजकारणात वरिष्ठांचा आदर ठेवण्याचे संस्कार त्या कधी विसरल्या नाहीत.

राजकारणात काम करत असताना जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये, याची काळजी त्या सतत घेत असतात. हीच काळजी त्यांच्यात सामान्य माणसांविषयी असलेली तळमळ दाखवून देते. सत्तेच्या काळात मंत्री म्हणून त्यांचे काम उल्लेखनीय असंच होतं, आपल्या खात्याच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ तर त्यांनी गोरगरिबांपर्यंत पोहोचविलाच परंतु त्याचबरोबर अनेक नव नवीन योजना अंमलात आणून लोक कल्याणाची एक अनोखी संकल्पना रूजविली. मध्यप्रदेशात सह प्रभारी म्हणून काम करीत असताना तिथल्या भाजप सरकारने राबविलेली 'लाडली बहना' योजना त्यांच्या आग्रहामुळे महाराष्ट्र सरकारने इथेही अंमलात आणली, हे त्यांच्यात असलेल्या लोकनेत्याचं उत्तम उदाहरण म्हणावं लागेल.

सत्तेच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी उपक्रम राबवल्याने त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली, ज्यामुळं अनेकांची पोटं दुखली, त्यांच्या विरोधात कट कारस्थानही रचली गेली पण, प्रत्येक 'विजयात संघर्ष' आणि प्रत्येक 'संघर्षात विजय' या लोकनेत्याच्या समीकरणाची शिकवण व संस्काराच्या शिदोरीवर त्यांनी इथेही विजय मिळवला. वंचित, शोषित, बहुजनांच्या हितासाठी मुंडे साहेबांचा वसा घेऊन सुरु झालेला त्यांचा राजकीय प्रवास रोखण्याचा निष्फळ प्रयत्न अनेकांनी केला, परंतु संघर्षाची शिकवण व जनसामान्यांचे असीम पाठबळ लाभल्याने त्यांना रोखणं कुणालाही शक्य झालं नाही.

मोठया माणसांचा वारसा चालवणं हे तसं एक आव्हानच असतं, ते पेलणं सर्वानाच शक्य होत असं नाही पण पंकजाताई मात्र याला अपवाद आहेत. मुंडे साहेबांचा वारसा होणं म्हणजे त्यांच्या सत्ता, संपतीचा वारसा होणं नाही, तर त्यांच्या आदर्श विचारांचा..वंचित, पिडित, शोषित, दीनदुबळ्यांची सेवा करण्याचा.. आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा वारसा चालवणं..जे काम पंकजाताई आपल्या राजकीय जीवनात अव्याहतपणे करत आल्या आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासताना 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही ' हे त्यांनी केवळ बोलून नव्हे तर आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. पद, सत्ता असो वा नसो मुंडे साहेबांचा माणसं जोडण्याचा सक्षम वारसा त्यांनी कायम जपला. आपल्या कामांतून त्यांनी वंचित, उपेक्षित घटकांची सेवा करून त्यांचे आशीर्वाद घेतले. समाजातील जातीभेद झूगारून एक माणूस म्हणून विविध घटकांना आपुलकीने जोडण्याचे काम त्या करत आहेत. सामान्य माणसासाठी अहोरात्र काम करण्याच्या स्वभावामुळे आलेल्या प्रत्येक संकटावर मात करत लोकनेत्याचा खरा वारसा त्या आज पुढेनेत आहेत. लोकांना त्यांच्या रूपात मुंडे साहेबच दिसतात, त्यांच्यावर येणारा प्रत्येक वार स्वतःच्या अंगावर घेण्यासाठी कार्यकर्ते सदैव तयार असतात. 'गोपीनाथ मुंडे हे नांव जगाला विसरू देणार नाही', अशी शपथ घेणारे त्यांचे स्वाभिमानी नेतृत्व संघर्षाच्या अग्निदिव्यातून बाहेर पडून पुन्हा तितक्याच रूबाबात आणि आत्मविश्वासाने वाटचाल करेल, यात तीळमात्र शंका नाही. परमेश्वर त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करो, त्यांच्या हातून जनसामान्यांची सेवा सतत होत राहो..याच आजच्या वाढदिवशी मनःपूर्वक शुभेच्छा..!

## आष्टी तालुक्यातील अरणविहिरा येथील पांदण रस्त्याचा बोजवारा ; पं.स.प्रशासनाचा भोंगळ कारभार

**कडा । प्रतिनिधी**


गावातील लोकांना हाताला काम मिळाले पाहिजे या दृष्टिकोणातून शासनाने प्रत्येक गावात,खेड्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविली जाते.मात्र हीच योजना गैरव्यवहाराचे कुरण ठरत असल्याचे दिसून येत आहे. या रस्त्याच्या संदर्भात १३ जून २०२४ ला रीतसर तक्रार करून सुध्दा कोणत्याही प्रकारची कारवाई न केल्याने पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याशी अर्थपूर्ण व्यवहाराचा वास येत असून ठराविक लोकांनी ग्रामीण रोजगार हमी योजनेचा गैरफायदा घेतात.शासनाची दिशाभूल करत आहेत.असाच काहीसा प्रकार आष्टी तालुक्यातील अरणविहीरा येथे घडला आहे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत वस्ती वर किंवा शेतात जाण्यासाठी गि-हे वस्ती ते शिंदे वस्ती या रस्त्याचे काम मंजुर करण्यात आलेले आहे, सदरील रस्त्याचे काम हे लोक सहभागातून ब-याच अंशी पूर्ण करणे गरजेचे होते,या रस्त्यावर काहीही काम न करता संबंधित कंत्राटदारांनी पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना हाताशी धरून बोगसरीत्या मजुरामार्फत काम केल्याचे दाखवून लाखों रूपायाचे देयक उचलले आहे, याबाबत ग्रामस्थांनी जाब विचारला असता चुकीची महिती देऊन धमकावले जात आहे व उर्वरित कुशलची बिल काढण्यासाठी जेसीबी मशीनने थातूरमातूर काम करण्याचा प्रयत्न ग्रामस्थांनी हाणून पाडल्यामुळे संतप्त होऊन धमकी दिली जाते.या कामावर नियंत्रण ठेवणारे पंचायत समितीचे अधिकारी,कर्मचारी यांच्यासह बोगस काम दाखवून शासकीय निधीचा अपहार करणारे कंत्राटदार यांच्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करून फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच याबाबत ताबडतोब कार्यवाही न झाल्यास किंवा शासनाने याची गंभीर दखल घेतली नाही तर अरणविहिरा ग्रामपंचायत सदस्य साखरबाई शिरसाठ यांनी आंदोलनाचा इशारा दिला असून ग्रामस्थांसह तहसील कार्यालय आष्टी येथे आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे पंचायत समिती मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे. काही लोकांना पैशाचे अमिष दाखवले.त्यांच्या खात्यावर मोठ्या प्रमाणात रक्कम टाकली.त्यांची नावं हजेरीपटावर दर्ज करण्यात आली, असा आरोप करण्यात आलाय. याशिवाय या बोगस बँक खात्यामध्ये रक्कम टाकण्यात आली.जे कामे झाले म्हणून दाखवित आहेत त्या सर्व कामाचे देयके,हजेरीपट,बँक स्टेटमेन्ट संपूर्ण कागदपत्रे तयार आहेत.पांदण रस्त्यावर मुरुमाची रॉयल्टी किती ब्रासची याची संपूर्ण माहिती देण्यात यावी.मोक्यावर येऊन गावाकऱ्यासमोर पांदण रस्त्याची चौकशी करण्यात यावी,अशी गावकऱ्यांची मागणी आहे.दोषी अधिकारी,पदाधिकारी यांना पदमुक्त करून गुन्हा दाखल करण्यात अशी मागणी केली आहे.अन्यथा गावकऱ्यांसह तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यासंदर्भात ग्रामपंचायत सदस्य साखरबाई शिरसाठ यांनी तक्रार केली आहे. या संदर्भात गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता तो न झाल्याने त्यांची बाजू समजली नाही

## महावितरण कार्यालयाच्या गलथान कारभार!

### विद्यार्थी व नागरिकांच्या जीवितास धोका, वीज पुरवठा करणारे केबल पावसात उघड्यावरच

**केज । प्रतिनिधी**

महावितरण कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थी व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून महावितरण कार्यालयाच्या विद्युत रोहित्राच्या बोर्डामधुन आनंद नगरीला वीज पुरवठा करणारे केबल जमिनीवर भर पावसात व पाण्यात उघड्यावरच आहेत यास जबाबदार कोण?असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.या बाबतची सविस्तर माहिती अशी की,पंचायत समिती च्या प्रांगणामध्ये महा वितरण कार्यालयाचे दोन विद्युत रोहित्र आहेत सदर रोहित्राचे वीज पुरवठा करणारे केबल (वायर) उघड्यावर आहेत व या रोहित्राचे फ्युज फुटलेले आहेत.मागील



आठ ते दहा दिवसांपूर्वी केज शहरात पंचायत समितीच्या प्रांगणावर आनंदनगरी आलेली आहे. सदर रोहित्रा मधून महा वितरण कार्यालयाने आनंद नगरीला वीज पुरवठा दिला आहे.परंतु सदर वीज पुरवठा करणारे केबल (वायर) हे जमिनी वर पावसात,पाण्यात, चिखलात उघडे आहे सदर केबलला जॉईंट आहेत व सदर केबलच्या वरील भागाचे कव्हर निघलेले आहे व आनंद नगरीचा लाईटचा बोर्ड देखील उघड्यावरच आहे त्या बोर्डामध्ये देखील लाईटचे वायर व फ्युजच्या तारा उघड्या पावसामध्येच आहेत.या प्रांगणाच्या जवळच एक शाळा, शिक्षकांची सहकारी पतपेढी गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय आहे.या शाळेतीलविद्यार्थी हे या प्रांगणावरती खेळत आहेत व अहिल्यादेवी नगर,वकीलवाडी या भागातील नागरिक हे देखील या ठिकाणाहून रहदारी करत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे यास कोण जबाबदार ? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. महावितरण कार्यालयाने आनंद नगरीला विज पुरवठा हा जमिनीतून न करता तो वीजपुरवठा करणारे केबल वायर हे विद्युत रोहित्राच्या पोल वरून अथवा लाकडाच्या सहाय्याने वरती बांधून द्यायला पाहिजे होते असे स्थानिक नागरिकांतून बोलले जात आहे.

## बीड जिल्ह्यासाठी २४७ होमगार्डची होणार नियुक्ती

**बीड ।प्रतिनिधी**

**बीड जिल्हयात होमगार्डमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध असून २४७ होमगार्डच्या रिक्त आहेत. अनुशेष भरण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन दि. २२ ऑगस्ट २०२४ पासून पोलीस मुख्यालय बीड येथे केले आहे. दि. २६ जुलै २०२४ ते १६ ऑगस्ट २०२४ अखेर ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले असून होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक नियम व अटीबाबत विस्तृत माहिती** https://maharashtracdhg.gov.in/mahaha/ioginl.php **या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.यासाठी जिल्हयातील स्त्री, पुरुष अर्ज करु शकतात.**

निवड होऊन पात्र ठरलेले उमेदवार हे वेतनी सेवेत असतील तर त्यांना वेतनी सेवेत असल्यास कार्यालयाचे अथवा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल आणि सक्षम वैद्यकीय अधिका-याचे शारिरिकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक अथवा एनसीसी प्रमाणपत्रधारक इतर अन्य तपशीलाच्या पृष्ठयर्थ सर्व संबधित प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारास नोंदणीच्या वेळी त्यांना स्वखर्चाने यावे लागेल तसेच नोंदणीच्यावेळी कोणतिही अपघाती घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. उमेदवाराची निवड पुर्णपणे गुणवत्तेवर करण्यात येईल. सदर अनुशेषामध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हा समादेशक होमगार्ड बीड यांना राहील. तरी होमगार्डमध्ये सेवा करु इच्छित असलेल्या बीड जिल्हयातील रहीवासी उमेदवारांनी नोंदणी करिता अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांनी केले आहे.

## शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालयात माता पिता पूजनाने गुरुपौर्णिमा साजरी

**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाचे एक वेगळे महत्त्व आहे. २१ जुलैला गुरुपौर्णिमा होती, या दिवशी संस्कृती विद्यालयातील ३००विद्यार्थ्यांचे आई आणि वडील गुरुपौर्णिमा सोहळ्याला आले होते. यावेळी स्वतः डॉक्टर श्री दत्ता नलावडे सर यांनी स्वतःच्या आईचे गुरुपूजन केले ही बाब इतरांसाठी प्रेरणादायी ठरली.**

तसेच डॉ. नलावडे सरांचे अनुकरण करून विद्यार्थ्यांनी आपापल्या आईवडिलांचे गुरुपौर्णिमेनिमित्त दर्शन घेतले. आई-वडिलांनी त्यांना डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. मी अभ्यास करेन व खूप मोठा होऊन तुमचे नाव मोठे करेल असा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला . तसेच सर्व विद्यार्थ्यांनी संस्कृती





विद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांचे गुच्छ देऊन स्वागत केले, एकूणच अत्यंत भावनिक आणि हृदयस्पर्शी हा प्रसंग होता. प्रत्येक व्यक्तीचे प्रथम गुरू हे त्याचे आई आणि वडील असतात, त्यांचे पूजन हा एक अनोखा उपक्रम गुरुकुलाने राबवला, अत्यंत उत्साहात कार्यक्रम साजरा झाला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैया सर यांनी केले, प्रस्ताविक खेडकर मॅडम यांनी केले, गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करतांना भारतीय संस्कृतीमध्ये गुरूंचे स्थान आणि त्यामध्ये आई-वडिलांचे असलेले महत्त्व याविषयी डॉ . दत्ता नलावडे सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम युट्युबवर लाईव्ह दाखवण्यात आला गुरुपौर्णिमेनिमित्त सामूहिक ग्रंथाचे पूजन करण्यात आले. ग्रंथ हाच गुरु हा मंत्र यावेळी उपस्थितांना दिला व ग्रंथ आपले जीवन समृद्ध बनवते. आधुनिक काळामध्ये वाचन संस्कृती ही कमी होत चालली आहे, तिचे पुनर्जीवन करणे आवश्यक आहे, असेही पुढे बोलताना संस्थापक/अध्यक्ष डॉ. दत्ता नलावडे सर यांनी सांगितले. एक आगळावेगळा हृदयस्पर्शी , अलौकीक असा कार्यक्रम गुरुपौर्णिमेनिमित्त साजरा झाला याचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे .

## ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूल बनतोय चिखलमय!

### सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्गावरील खड्डे त्वरित दुरुस्त करावेत;मुख्याधिकारी साहेब लक्ष कधी देणार-ॲड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**परळी येथील ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावर येणाऱ्या वाहतुकीच्या वाहनांमुळे हा मार्ग चिखलमय झाला आहे. याचा तेथील नागरिकांना त्रास भोगावा लागत असून वाहतूकदारांना सुद्धा अडचणीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची या त्रासातून सुटका व्हावी तसेच पुलावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्त करावे आणि मंजूर झालेल्या ट्रान्सपोर्ट रोजचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि सार्वजनिक विभागाचे मुख्य अभियंता यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.**

रेल्वे उड्डाणपूल ला खालील ट्रान्सपोर्ट रोड वरून मालाची वाहतूक करणारी जड वाहने ब्रिजवरून जात असतात. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि त्या रोडवर चिखल साचल्यामुळे त्या वाहनांच्या चाकांना माती लागल्यामुळे सर्वत्र चिखल पसरला आहे त्याचा परिणाम म्हणून वाहनधारक तेथे त्यांचे एक्सीडेंट होत आहेत. पायी चालणारे हे सुद्धा या चिखलात घसरून पडत असल्यामुळे त्यांना मणक्याचे



त्रास होत आहेत. या प्रकरणांमध्ये नगरपालिकेचे मुख्य अधिकारी श्री त्रिंबक कांबळे हे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत असे नागरिक बोलत आहेत. परळी वैजनाथ हे ज्योतिर्लिंगाचे ठिकाण असून येथे दर्शनासाठी राज्यभरातून तसेच बाहेरच्या राज्यातून नागरिक येतात येणाऱ्या नागरिकांना परळी वैद्यनाथाचे नवल असते मात्र शहराचे मार्ग पाहिल्यास त्यांची निराशा होते. त्यामुळे उड्डाण पुलावडील मार्गावर पडलेले खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने पवित्र श्रावण महिन्याच्या अगोदर दुरुस्त करावेत अशी मागणी सार्वजनिक खात्याकडे त्यांनी केली आहे. या रोडवर सर्वत्र खड्डे पडले असून या खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. पाणी साचल्यामुळे तेथील नागरिकांना रहदारीसाठी त्रास आणि अडचण भोगावी लागत आहे. मालवाहतूक करणारी जड वाहने अंबाजोगाईकडे जातात किंवा परभणी रोड बीड रोड या रोडवर ही वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत त्यामुळे जाणून बुजून दुर्लक्ष करणारे मुख्याधिकारी यांना सामान्य जनता माफ करणार नाही. या प्रकरणी परळीचे तहसीलदार तसेच नायब तहसीलदार श्री. रुपनर साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला आहे तरी या गंभीर विषयाची त्यांनी दखल घ्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे






सायं.दैनिक

बीड

# प्रारंभ

शनिवार दि. २७ जुलै २०२४ (पान ४)







# कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची अत्यंत दूरावस्था; नागरिकांचे हाल!

## गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता डांबरापासून वंचित; नागरिक संतप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची पावसाळ्यात दुरवस्था झाली आहे. ४ किलोमीट अंतराचा रस्ता हा जीवघेणा बनला असून पावसामुळे रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मार्गक्रमण करावे लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या या प्रमुख रस्त्याकडे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांनी ताबडतोब लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित आहे. कोमलवाडी व भोजगाव ही ग्रुप ग्रामपंचायत असून या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या कसरतीने या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामपंचायत भोजगाव येथे असल्यामुळे ग्रामस्थांना त्याठिकाणी जावं लागतं, सध्या पावसाळा सुरू असल्याने हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता चिखलमय होऊन रस्त्यात खड्डेच खड्डे पडले असून वाहने चालवणे जिकिरीचे बनले आहे. तसेच नागरिकांना चिखलातून पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. दळणवळणासाठी कोमलवाडी ते भोजगाव हा प्रमुख रस्ता असल्यामुळे येथील नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते, ग्रामपंचायतीच्या कामासाठी, उमापूर येथील बँकेच्या कामासाठी, शेतात जाण्यासाठी तसेच इत्यादी महत्वपूर्ण कामासाठी कोमलवाडी येथील कोमलवाडी येथील नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करावी लागते. पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडले असून ते खड्डे चुकविण्याच्या नादात तसेच गाडी घसरून अनेकवेळा नागरिक पडत आहेत. शेतकऱ्यांना, महिलांना या रस्त्यावरून दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीववित्वाला धोका निर्माण झाला आहे. ▶▶ पान २ वर...

**आमदार लक्ष्मण पवार यांनी लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित?**



### कोमलवाडी-भोजगाव रस्त्याची दयनीय अवस्था!

मागील काही वर्षांपूर्वी कोमलवाडी फाट्यापासून ते कोमलवाडी गावालगत रास्त्याचे अर्धवट डांबरीकरण झालेले आहे. कोमलवाडी ते भोजगाव या रस्त्याची दयनीय दुरवस्था झालेली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सध्या काही मुरुम टाकून नागरिकांना येण्या जाण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. सदरील हा रस्ता डांबरीकरण करण्यासाठी आम्ही आतापर्यंत आमदार लक्ष्मण पवार यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. यापुढे देखील करणार आहोत. सदरील हा रस्ता डांबरीकरण होणारच आहे. परंतु लवकरात लवकर होण्यासाठी प्रयत्न करणार – सुर्यकांत धनवडे, उपसरपंच कोमलवाडी

# मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचा गरजु दिव्यांगांनी लाभ घ्यावा

## शिबीर आयोजक विजयसिंह पंडित यांचे आवाहन

**गेवराई । प्रतिनिधी**

शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दि.२८ जुलै २०२४ रोजी र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे सकाळी १० वाजता मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीराचे उद्घाटन आष्टीचे आमदार बाळासाहेब आजबे यांच्या शुभहस्ते होणार आहे. शिबीरात गरजू दिव्यांगांना



अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबरपासून निर्मित अत्यंत हलके व मजबुत कृत्रिम हात व पाय मोफत बसवून दिले जाणार आहेत. गरजू दिव्यांगांनी शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन केले आहे. रविवार, दि.२८ जुलै रोजी सकाळी १० वाजता र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आयोजित शिबीराचे उद्घाटन आ. बाळासाहेब आजबे यांच्या शुभहस्ते होणार आहे. शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबीरात अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबरपासून निर्मित, अत्यंत हलके व मजबुत कृत्रिम अवयव उपलब्ध करून दिले जाणार आहेत. कृत्रिम अवयव लावल्यानंतर मनुष्य चालू शकणार आहे, टेकडी चढू शकतो, सर्व दैनंदिन कामे करू शकतो ▶▶ पान २ वर...

# शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय मार्गाचे काम तीन महिन्यात पुर्ण होणार

## साकेतच्या गुत्तेदाराशी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांची चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

शिरापुर धुमाळ ते जरूड फाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असुन हे काम सध्या ४० टक्के झाले आहे. उर्वरित काम ३ महिन्यात पुर्ण करण्याचे नियोजन असुन या कामात महावितरणचे पोलशिप्टींग,नवीन विद्युत लाईन टाकण्याचे काम सुरू असुन बीड शहरात काही भागात रस्त्यालगत नळ योजनेचे पाईप स्थलांतरीत करण्याचे काम होत आहे. शहरातून जाणारा हा रस्ता लवकर पुर्ण करण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करत असल्याचे साकेत कन्स्ट्रक्शनच्या गुत्तेदारांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याशी बोलताना सांगितले आहे.माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दोन दिवसापुर्वीच रस्त्यावर काम करणार्या साकेत कन्स्ट्रक्शनच्या गुत्तेदाराशी चर्चा केली. सध्या शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या कामामुळे शहरातील व ग्रामीण भागातील नागरीकांना वाहतूकीस त्रास सहन करावा लागत आहे.हा रस्ता मुख्य रहदारीचा आहे.सध्या याचे काम ४० टक्के झाले आहे. ऐन पावसाळ्यात देखील हे काम सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ लागला आहे,शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा हा फोर लाईन सिमेंट रस्ता असुन दोन्ही बाजूनी नाल्यासहीत काम होणार आहे.मात्र अजुनही ६० टक्के काम बाकी आहे. माजी मंत्री क्षीरसागर यांनी साकेतचे गुत्तेदार यांच्याशी संपर्क साधुन हे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशा सुचना दिल्या. त्यानुसार येत्या तीन महिन्यात हे काम पुर्ण करू असे आश्वासन दिले आहे. २४ किलोमिटर लांबीचा हा रस्ता असुन यात ६ पुलाची कामे असुन १६० कोटींचा हा रस्ता आहे. बीड शहरातून जाणार्या रस्त्याच्या लांबीत सहा किलोमिटर रस्ता काम होणार आहे. चौपदरी होणार्या या रस्त्यामुळे बीडचा हा भाग शहराच्या वैभवात भर घालणारा ठरणार आहे.तीन महिन्यात म्हणजे दिवाळीपुर्वीच या रस्त्याचे काम होणार असुन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे यासाठी पाठपुरावा करत आहेत.

# ओबीसी योद्धा प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचे चौसाळा शहरात जंगी स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाचे नेते प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ(आबा) वाघमारे हे चौसाळा शहरात आले असता त्यांचे ओबीसी बांधवांनी जंगी स्वागत केले यावेळी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. प्रा. लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे मागील दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. ते यातून संवाद साधत ओबीसी बांधवांमध्ये जनजागृती करत आहेत त्यांच्या आगमना निमित्त ठिकठिकाणी रॅली,संवाद सभा आयोजित करण्यात येत



आहे. बुधवारी दिनांक २४ रोजी प्रा. लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारे यांचे चौसाळा शहरात आगमन झाले. यावेळी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात ओबीसी ▶▶ पान २ वर...

# सर्वसामान्यांशी नाळ जोडलेल्या देवदूत ओमप्रकाश शेटे यांना उमेदवारी द्यावी-गंगाधर गडदे

**बीड । प्रतिनिधी**

आयुष्यमान भारत , मिशन महाराष्ट्र समिती चे अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांना माजलगाव मतदार संघात भारतीय जनता पक्षांने उमेदवारी द्यावी , महात्मा जोतिराव फुले व आयुमान भारत च्या माध्यमातून डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांनी अनेक रुग्णाचे जीव वाचवत आहेत. देवदूत डॉ ओमप्रकाश शेटे साहेब हे नेहमीच सर्वसामान्यांच्या सुख;दुखात सहभागी असतात. सर्वसामान्य शी नाळ जोडलेला माणूस म्हणून देवदूत डॉ



ओमप्रकाश शेटे साहेब यांची ओळख आहे. रूग्णसेवेने माजलगाव मतदार संघात घराघरात पोहचलेले डॉ ओमप्रकाश शेटे याना उमेदवारी देण्यात यावी ही कार्यकर्ते व माजलगाव मतदार संघातील लोकांची इच्छा आहे , व डॉ ओमप्रकाश शेटे यांच्या रूपाने माजलगाव करानां एक माणसाच्या रूपाने देव मिळेल तसाच माजलगाव मतदार संघात विकासाला तोड राहणार नाही, माजलगावचे भूमिपुत्र आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र ▶▶ पान २ वर...

# डॉ. शिशीर खोसेंचा उत्कृष्ट सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ पुरस्काराने सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौंदर्यशास्त्र, त्वचारोग व केश सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ डॉ. शिशीर खोसे यांचा उत्कृष्ट उदयन्मोख सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ पुरस्काराने सन्मान करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध क्षेत्रातील वैद्यकीय तज्ज्ञांचा गौरव करण्यात आला.

अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश चव्हाण, बालहक्क आयोगाच्या सदस्य व राष्ट्रवादी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड. प्रज्ञा खोसरे, कल्पतरुच्या सचिव डॉ. सारिका क्षीरसागर, युवती



आघाडीच्या अध्यक्ष प्रिया डोईफोडे, वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश शिंदे यांच्या हस्ते डॉ. शिशीर खोसे यांचा सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. पद्मांजली स्किन केअर हॉस्पीटलचे डॉ. खोसे यांनी सौंदर्याच्या समस्यांसह कुष्ठरोगांच्या दुर्धर रुग्णांवरही यशस्वी उपचार केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बोलघेवड्या सरकारकडून निदान १५ ऑगस्टला तरी मोफत शालेय गणवेश मिळणार का?

## दिड महिना उलटूनही विद्यार्थी गणवेशाच्या प्रतिक्षेत-डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

राज्यसरकारने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून एक राज्य एट गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असुन समग्र शिक्षा अभियान व मोफत गणवेश वाटप योजने अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित गणवेश संच महिला आर्थिक



विकास महामंडळाच्या माध्यमातून स्थानिक महिला बचत गटांतर्फे शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.तर स्काऊट या विषयास एक गणवेश संच संबंधित शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.मात्र शाळा सुरू होऊन दिड महिना तरीही अद्याप विद्यार्थ्यांना गणवेश न मिळाल्याने बोलघेवड्या सरकारकडून निदान १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी तरी विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश मिळणार का?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. निधी प्राप्त होताच मोफत गणवेश वाटप करण्यात येईल:- अमर पुरी (सहशिक्षक ( लिंबागणेश केंप्राजिपशा)

राज्य शासनाच्या समग्र शिक्षण अभियान व मोफत गणवेश योजने अंतर्गत शालेय विद्यार्थी -विद्यार्थीनींना मोफत गणवेश वाटप करण्यात येते .मात्र यावर्षी शासनाचे धोरण बदलल्याने गणवेशासाठी ▶▶ पान २ वर...

# उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री कंकालेश्वरास व शनी मंदिर महाभिषेक,फळ वाटप जिव्हाळा बेघर केंद्र अन्नदानाचा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब, यांच्या वाढदिवसानिमित्त युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब, संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे,संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीनभैय्या धांडे यांच्या वतीने व उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप,राजू महुवाले, शहर प्रमुख शेख निजाम भाई,सुशील पिंगळे,युवा सेना जिल्हाप्रमुख गजानन कदम,कैलास वीर यांच्या



**शिवसेना जिल्हा संघटक नितीनभैय्या धांडे यांचा पुढाकार**

प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्ह्याचे ग्रामदेवत श्री क्षेत्र कंकालेश्वर या ठिकाणी महाअभिषेक व आरती करून तसेच शनी मंदिर मोंढा परिसरामध्ये शेतकऱ्यांना खाऊचा वाटपाचा व बीड शहरातील जिव्हाळा बेघर केंद्र या ठिकाणी अन्नदानाचा कार्यक्रमासह यास बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये प्रत्येक गावामध्ये महाआरती करून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री व विधानसभेवरती भगवा फडकवण्यासाठी ग्रामदेवतांना साकडे घालण्यात आले या सर्व कार्यक्रमांना शिवसैनिक मोठ्या उत्साहामध्ये जय भवानी जय शिवराय हर हर महादेव च्या घोषणा देत सहभागी झाले होते विविध सामाजिक

# महाविकास आघाडीने शेकापच्या भाई ॲड.नारायण गोले पाटलांना उमेदवारी द्यावी-भाई गणपतराव कोळपे

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्हा लाल बावटयाचा बालेकिल्ला म्हणून पूर्वी ओळखला जायचा याच बीड जिल्ह्याने सन १९६७ साली थोर स्वातंत्र्य सेनानी प्रति सरकारचे संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांना लोकसभेत पाठवले, त्यानंतर स्वातंत्र्यसेनानी माजी खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी देखील जिल्ह्याचे नेतृत्व केले, त्यानंतर गेवराईतून माजी आमदार भाई पवार, चौसाळा मतदारसंघातून माजी आ. भाई जनार्दन तुपे तर बीड विधानसभेत माजी आ.कॉम्रेड काशिनाथराव जाधव यांच्यासह अनेक लालबावट्याचे आमदारही निवडून आले, त्यामुळे बीड जिल्हा लालबावट्याचा बालेकिल्ला समजला जात असे, सन २००४ साली शेकापच्या भाई थावरेंनी याच मतदारसंघात तब्बल ३५ हजार मते मिळवली होती. तर माजलगाव मतदार संघात चौसाळा मतदार संघातील वडवणी व धारूर तालुक्याचा समावेश झालेला असल्याने वडवणी, धारूर या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मानणारा खूप मोठा वर्ग आहे. माजलगाव मतदार संघात २०१९ साल च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस,शेतकरी कामगार पक्ष आघाडीच्या आ.प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनतेने शरदचंद्रजी पवार साहेब आणि पुरोगामी विचाराचे प्रतिनिधी म्हणून विजयी केले परंतु त्यानंतर आ.प्रकाश सोळंके यांनी अवघ्या काही तासात पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा दर्शवून भारतीय जनता पक्षाला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन माजलगाव मतदार संघातील जनतेचा विश्वासघात केला होता, पुढे ईडीच्या भीतीमुळे अजित पवार यांनी भाजप सोबत जाण्याचा घेतलेल्या निर्णयाला संमती दर्शवत आ. प्रकाश सोळंके हे भाजप सोबत गेलेल्या राष्ट्रवादीच्या गटात ईडीच्या भीतीपोटी सामील झाले, केवळ सत्तेचा माग धरून काम करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेला वाऱ्यावर सोडण्याचे पाप केले,परंतु माजलगाव मतदार संघात शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचे लढाऊ नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांनी आपल्या आक्रमक भूमिकेने अनेक मोर्चे , आंदोलने करून प्रशासनासह शासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत, शेतकऱ्यांची खते बी बियाण्या मध्ये होणारी लूट, प्रशासनातील अधिकारी ▶▶ पान २ वर...



# पंकजा मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**शिरुर । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिवरसिंगा येथील जिल्हापरिषद शाळेच्या प्रागंणात भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पंकजा मुंडे यांनी वाढदिवस साध्या पध्दतीने साजरा करणार असल्याचे आणि कार्यकर्त्यांना हि हार-तुरे स्वीकार नाही असे आवाहन केले होते यामुळे पंकजा मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त हिरवरसिंगा ग्रामस्थांनी वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला . वृक्षारोपण डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले .



वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे डॉ.क्षीरसागर प्रतिपादन यांनी केले. यावेळी मंगेश सानप, बाळासाहेब दुधाळ, अनिकेत सानप, केतन गायकवाड, विजय हतागळे,श्रीराम सानप,अभिजित सानप,मुकुंद बडे तसेच शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ तरुण बांधव उपस्थित होते.